REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे(वैयक्तीक) मासिक उत्पन्न: एक अध्ययन

सचिन देवरावजी गेडेकर[1] , डॉ. अरूण न. दसोडे[2]
[1] संशोधनकर्ता
[2] मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविधालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.

## सारांश

प्रस्तुत अध्ययनात चंद्रपूर जिल्ह्यातील माजरी तेलवासा कोलफिल्ड, चांदा कोलफिल्ड, घुग्गुस निलजई कोलफिल्ड, बल्लारपूर कोलफिल्ड, सास्ती राजूरा कोलफिल्ड, विरूर चिंचोली कोलफिल्ड व विरूर कोलफिल्ड या सात खाणी वरील प्रत्येकी १०० याप्रमाणे एकुण ७०० कंत्राटी मजूरांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान संबंध तपासण्याकरीता काई वर्ग परिक्षण या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले. संकलित केलेली माहिती विभागवार वर्गीकृत करण्यात आली. प्रत्येक सारणी खाली त्या सारणीतील माहितीचे स्पष्टीकरण देण्यात आले व स्पष्टीकरणाअंती परिणाम देखील प्रस्तुत करण्यात आले.



## प्रस्तावना

चंद्रपूर जिल्हा हा खनीज संपत्तीने परिपुर्ण असून राज्यातील बहुतांश कोळसा खाणी या जिल्ह्यात उपलब्ध आहेत. खाणीत काम करण्याकरिता नियमित मनुष्यबळ उपलब्ध असले तरी खाणीतील संपूर्ण कार्याकरिता हे मनुष्यबळ अपूरे पडते. मनुष्यबळाची ही कमतरता भरून काढण्याकरिता खाण व्यवस्थापनाला अतिरिक्त मनुष्यबळाची व्यवस्था करावी लागते. त्याकरिता कंत्राटी कामगारांची मदत घेण्यात येते. कंत्राटी कामगारांची भरती रोजंदारी तत्वावर कंत्राटदाराद्वारे करण्यात येते.

नियमित खाण कामगारांप्रमाणे कंत्राटी कामगारांना सुविधा प्राप्त होत नाही तथापि प्रत्यक्षपणे नियमित व कंत्राटी कामगारांच्या श्रमाची तुलना केली असता या दोघांच्या श्रमभारात कोणताही सार्थक फरक दिसून येत नाही. कंत्राटी कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधी, आरोग्य सुविधा, अतिरिक्त कार्य, निवास व्यवस्था, विमा इत्यादी सर्व सुविधांची जवाबदारी कंत्राटदाराकडे सोपविण्यात येते कंत्राटदार मात्र प्रत्यक्षात या सेवा कामगारांना उपलब्ध करून देतो अथवा नाही याच्याशी खाण व्यवस्थापन अनभिज्ञ असते.

कंत्राटी तत्वावरील खाण मजूरांच्या आर्थिक उत्पन्नाचा विचार केला असता त्यांचे आर्थिक उत्पन्न नियमित खाण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत अत्यल्प असते. त्यांना या उत्पन्नातून आपल्या दैनिक गरजा भागवणेदेखील शक्य नसते आपल्या गरजा भागविण्याकरीता घेतलेल्या कर्जामुळे त्यांची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालवत जाते या मजूरांद्वारे घेण्यात येणाऱ्या कर्जाचे स्त्रोत हे कंत्राटदार किंवा सावकार असल्यामुळे हे त्यांच्या पाशातून सुटू शकत नाही कारण या स्त्रोतांकडून घेण्यात आलेल्या कर्जाचे व्याज दर हे अत्याधिक असतात. आर्थिक स्थिती कमकूवत असल्यामुळे कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्यांना काम करावे लागते व प्रसंगी कुटुंबातील

अल्पवयीन सदस्यांना देखील आर्थिक उत्पन्नात आपला हातभार लावावा लागतो. वाढती महागाई कुटुंबाच्या गरजा व हलाखीची आर्थिक परिस्थिती या विवंचनेत सापडून हे कामगार व्यसनाधीन होतात. ज्यामुळे त्यांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होते परिणामी अपत्यांचे शिक्षण बाधीत होऊन त्यांच्यावर कुसंस्कार होण्याची सुरूवात होते याप्रमाणे मागील पिढीच्या पाऊलांवर पाऊल ठेवून पुढची पिढी मार्गक्रमण करित असते. यामुळे हे कुटुंब आपला विकास साधू शकत नाही.

**सारणी क्रमांक १ : चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे (वैयक्तीक) मासिक उत्पन्नासंबंधी माहिती**

| मासिक उत्पन्न (वैयक्तिक) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. ३००० पेक्षा कमी | - | - |
| रु. ३००० ते ६००० | - | - |
| -रु.६००० ते ९००० | - | - |
| रु. ९००० ते १२००० | - | - |
| रु. १२००० पेक्षा अधिक | ७०० | १००.० |
| **एकूण** | **७००** | **१००.०** |
| **Chi Square** | **DF** | **P-Value** |
| **2800** | **4** | **<0.05** |

Chi square – काई वर्ग मूल्य; DF (Degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; P-Value- P मूल्य

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे(वैयक्तीक) मासिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. वरील माहिती वरून असे दिसून येते की १०० टक्के मजूरांचे वैयक्तीक मासिक उत्पन्न रू. १२००० पेक्षा अधिक असल्याचे आढळून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे(वैयक्तीक) मासिक उत्पन्नानुसार तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य :- २८००; स्वातंत्र्यांश- ४; P मूल्य <०.०५) अंतर आहे. यावरून चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांदरम्यान रू. १२००० पेक्षा अधिक वैयक्तीक मासिक उत्पन्न असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येते

**सारणी क्रमांक २: चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांच्या कौटुंबिक मासिक उत्पन्नासंबंधी माहिती**

| कौटुंबिक मासिक उत्पन्न | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. ५००० पेक्षा कमी | - | - |
| रु. ५००० ते १०००० | - | - |
| रु. १०००० ते १५००० | - | - |
| रु. १५००० ते २०००० | ३१ | ४.४ |
| रु. २०००० पेक्षा अधिक | ६६९ | ९५.६ |
| **एकूण** | **७००** | **१००** |
| **Chi Square** | **DF** | **P-Value** |
| **2503.729** | **4** | **<0.05** |

Chi square – काई वर्ग मूल्य; DF (Degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; P-Value- P मूल्य

सारणी क्रमांक २ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे कौटुंबिक मासिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ९५.६ टक्के मजूरांचे कौटुंबिक मासिक उत्पन्न

रू.२०००० पेक्षा अधिक असून रू. १५००० ते २०००० कौटुंबिक मासिक उत्पन्न असणाऱ्या मजूरांची टक्केवारी४.४ टक्के होती. चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे कौटुंबिक मासिक उत्पन्नानुसार तुलना केली असता,त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य :-२५०३.७२९; स्वातंत्र्यांश- ४; P मूल्य <०.०५) फरक दिसून येते. यावरून चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांदरम्यान रू.२०००० पेक्षा अधिक कौटुंबिक मासिक उत्पन्न असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्रमांक ३ : चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे उत्पन्नाचे इतर स्त्रोतासंबंधी माहिती**

| उत्पन्नाचे इतर स्त्रोत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | ७८ | १००.० |
| व्यवसाय | - | - |
| इतर | - | - |
| **एकूण** | **७८** | **१००** |
| **Chi Square** | **DF** | **P-Value** |
| **156** | **2** | **<0.05** |

Chi square – काई वर्ग मूल्य ; DF (Degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; P-Value- P मूल्य

प्रस्तुत सारणी क्रमांक ३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे उत्पन्नाचे इतर स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविलेली आहे वरील माहिती वरून असे दिसून येते की १०० टक्के मजूरांचे उत्पन्नाचे इतर स्त्रोत शेती असल्याचे आढळून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांचे उत्पन्नाचे इतर स्त्रोतानुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य :-१५६; स्वातंत्र्यांश- २; P मूल्य <०.०५) अंतर आहे. यावरून चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांदरम्यान उत्पन्नाचे इतर स्त्रोत शेती असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येते.

## निष्कर्ष

चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या मजूरांदरम्यानरू. १२००० पेक्षा अधिक वैयक्तीक मासिक उत्पन्न असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे मजूरांदरम्यान रू.२०००० पेक्षा अधिक कौटुंबिक मासिक उत्पन्न असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे. मजूरांदरम्यान उत्पन्नाचे इतर स्त्रोत शेती असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहेमजूरांदरम्यान कोरडवाहू शेती उपलब्ध असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे मजूरांदरम्यान इतर स्त्रोतांपासून रू २००० पेक्षा कमी मासिक उत्पन्न प्राप्त करणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे मजूरांदरम्यान आर्थिक बचत करणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहेमजूरांदरम्यान बँकेत आर्थिक बचत करणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे मजूरांदरम्यान मासिक स्वरूपात आर्थिक बचत करणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे मजूरांदरम्यान करण्यात येणाऱ्या वार्षिक बचतीची अंदाजे रक्कम रू १००० ते ५००० असणाऱ्या मजूरांची संख्या सर्वाधिक आहे

## संदर्भ ग्रंथसूची

१. इंदूरकर, भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर (२०००)
२. खडसे, भा. कि., समाजशास्त्र परिचय, हिमालय पब्लिकेशन्स हाऊस, नागपूर
३. घाटोळे रा. ना. (१९९२) - सामाजिक संशोधन पद्धती व तत्त्वे मंगेश प्रकाशन नागपूर पृ क्र. 30
४. घाटोळे. रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९-१० .पृ.क्र. १ ते २३.
५. चव्हाण प्रा. एन. एल., भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग २, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२००४)
६. चव्हाण, प्रा. एन. एल., भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग १, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२००३)

७. जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, 35-ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७९
८. जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, २०१४, गडचिरोली जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन
९. झिंगन, विकास का अर्थशास्त्र एवं नियोजन, कोनार्क पब्लिकेशन्स, दिल्ली (१९९७)
१०. देशमुख, प्र., १९७९, व्यवसाय प्रशासन, सिंद्धात आणि पद्धती, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशरस्, नागपूर
११. देसाई-भालेराव, भारताची आर्थिक समस्या १ व २, निराली प्रकाशन.
१२. धुरी नीलम, संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती २००८, पृ.क्र. १.
१३. पाटील.का, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक (२००१)
१४. फडणवीस.मृ., देशपांडे.प्रा., श्रम अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशरस्, नागपुर(२००२)
१५. बोधनकर सु. व अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३ : ८९
१६. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९३: २७८.
१७. बोधनकर, सु. व चव्हाण, सा., श्रम अर्थशास्त्र, श्री साईबाबा प्रकाशन, नागपूर
१८. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९७६:१४७.
१९. महाजन.मु., भारतीय अर्थरचना, निराली प्रकाशन, पुणे(१९९८)
२०. महाजन.मु., भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, निराली प्रकाशन, पुणे(२००७)
२१. मेघे, ज्ञानेश्वर., १९७५, श्रमसमस्या आणि औद्योगिक संबंध, पडगिलवार नागपूर, पृ, १६
२२. मोघे किरण, असंघटितांना संघर्शाषिवायपर्याय नाही, कामगार विश्व, वाट संघर्षाची, संपादक रघुनाथ कुचिक, सौर पब्लिकेशन्स पुणे, २०१२